# समाजमन घडविण्यात पत्रकारांचे मोठे योगदान

## खासदार रामदास तडस : श्रमिक पत्रकार संघाचा मराठी पत्रकारदिन समारंभ

वर्धा : समाजासमोरील समस्या, प्रश्नांना वाचा फोडण्याकरिता पत्रकारांचे योगदान महत्त्वाचे आहे. वाचकांपर्यंत वृत्त पोहोचविण्याकरिता त्यांच्या धडपडीची, परिश्रमाची नोंद घेतली पाहिजे. आजच्या स्पर्धेच्या युगात पत्रकारांपुढे अनेक आव्हाने आहेत. त्या आव्हानांचा सामना करताना समाजमन घडविण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांच्या हातून घडत आहे. जिल्हास्थळी पत्रकार भवन व्हावे, याकरिता मी खासदार निधीतून २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देईल, अशी घोषणा खासदार रामदास तडस यांनी येथे केली.

वर्धा श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने सोमवारी (ता. सहा) आयोजित मराठी पत्रकारदिन तथा चौथा स्तंभ पुरस्कार समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी आमदार डॉ. पंकज भोयर, ज्येष्ठ पत्रकार रणजित मेश्राम, ज्येष्ठ पत्रकार हरिभाऊ वझुरकर, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा सावळे, सामाजिक कार्यकर्ते सुनील बुरांडे, धुनिवाले देवस्थानचे अध्यक्ष हरीश व्यास, इक्राम हुसैन यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी रणजित मेश्राम म्हणाले, आज राजकारणाने पत्रकारिता क्षेत्राला आपल्या प्रभावाखाली घेतले आहे. आजच्या पत्रकारितेसमोरच हेच खरे आव्हान आहे. वर्धा श्रमिक पत्रकार संघाने पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रदीप मैत्र आणि रणजित मेश्राम यांची निवड केली, ती अगदी अचूक आहे. आपल्या टोकदार लेखणीने या दोघांनी पत्रकारितेचे क्षेत्र समृद्ध केले आहे. प्रदीप मैत्र यांचे कर्तृत्व फार मोठे आहे. ते पत्रकारांचे खऱ्या अर्थाने नेते आहेत. विश्वासार्हता ही त्यांच्या नावाशी जोडली गेली आहे.

आमदार डॉ. भोयर म्हणाले, सत्कारमूर्ती प्रदीप मैत्र, विनोद देशमुख यांचे  पत्रकारितेतील योगदान मोठे आहे. त्यांनी पत्रकारितेची मूल्ये टिकवून ठेवण्याकरिता आयुष्य खर्ची घातले. सामाजिक कार्यकर्ते बा. दे. हांडे यांनी राष्ट्रसंत, ग्रामगीतेचे विचार पेरण्याकरिता आपले जीवन वाहून घेतले आहे.

सत्काराला उत्तर देताना विनोद देशमुख म्हणाले, रमाबाई वझुरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मिळालेल्या पुरस्काराचा मला अतीव आनंद आहे. पत्रकारांनी दोन्ही अंगांचा विचार करून तटस्थपणे आपली लेखणी चालवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रदीप मैत्र म्हणाले, आज आपल्याला जांभेकरी पत्रकारितेची अत्याधिक गरज आहे. गोदी मीडिया आणि त्याविरोधातील मीडिया अशी माध्यमांची सध्या विभागणी झाली आहे. खरी पत्रकारिता आज दडपणात आहे. पत्रकारितेत येणारी नवी पिढी आजही सकारात्मक आणि सामाजिक परिवर्तनाचा ध्यास मनी बाळगणारी आहे, हीच समाधानाची बाब आहे. यावेळी हरिभाऊ वझुरकर यांनी जिल्हास्थळी पत्रकार भवन आणि पत्रकार सहनिवास व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करताना त्याकरिता सर्वतोपरी सहकार्य करण्याची हमी दिली.

संचालन प्रा. डॉ. प्रवीण वानखेडे यांनी केले. प्रास्ताविक प्रवीण धोपटे यांनी केले. मानपत्राचे वाचन प्रफुल्ल व्यास, आनंद इंगोले यांनी केले. गजानन गावंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

------------

**कर्तृत्वाचा सन्मान**

यावेळी सामाजिक कार्यकर्ते बा. दे. हांडे यांना मान्यवरांच्या हस्ते वर्धा श्रमिक पत्रकार संघाचा ङ्कचौथा स्तंभ सामाजिक पुरस्कारफ देऊन गौरविण्यात आले. तसेच ज्येष्ठ पत्रकार प्रदीप मैत्र, नागपूर यांना हरिभाऊ वझुरकर प्रायोजित ङ्कवासुदेवशास्त्री वझुरकर स्मृती चौथा स्तंभ पत्रकारिता पुरस्कारफ तर ज्येष्ठ पत्रकार विनोद देशमुख, नागपूर यांना ङ्करमाबाई वझुरकर स्मृती चौथा स्तंभ पत्रकारिता पुरस्कारफदेऊन सन्मानित करण्यात आले.

----------

**फोटोओळ : सामाजिक कार्यकर्ते बा. दे. हांडे, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप मैत्र, विनोद देशमुख यांना सन्मानित करताना खासदार रामदास तडस, आमदार डॉ. पंकज भोयर आणि मान्यवर.**

---------


वर्धा श्रमिक पत्रकार संघ, वर्धा





